

मी फक्त टिंब...

प्रतिभा गोरे

मी फक्त टिंब...

प्रतिभा गोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

मी फक्त टिंब...

कविता संग्रह : प्रतिभा गोरे

प्रतिभा दिलीप गोरे
C/O दिलीप दत्तात्रय गोरे
परेश आपर्टमेंट
२३५ ब २ पर्वती पायथा
पुणे ४११००९
फोन ९४०४२३४३४०

मुखपृष्ठ छायाचित्र- प्रतिभा गोरे
निर्मिती सहाय्य व संपादन- आसावरी काकडे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवयत्रीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवयत्रीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २२ एप्रिल २०२३ (अक्षयतृतिया)

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

ही तुझीच इच्छा...
मी फक्त टिंब, हो ना?

प्रतिभा आणि तिच्या कवितांविषयी-

प्रतिभा गोरे माझी धाकटी बहीण. मनस्वी, हरहुन्नरी आणि प्रयोगशील. कोणतीही गोष्ट करण्यात, मग ती स्वयंपाक.. मुलांचं संगोपन करणं असो की माणसं.. घटनांना सामोरं जाणं असो.. तिचा स्वतःचा वेगळा दृष्टिकोन असतो. ती घर संसार, मुलंबाळं, नातवंडं यांना प्राधान्य देत त्यात रमलेली असते. पण ती कशातूनही, कुणातूनही लगेच अलिप्तही होऊ शकते. प्रचंड सकारात्मक ऊर्जा आहे तिच्यात. पाण्यासारखी अडथळ्यांना वळसा घालून ती पुढे जात राहाते...

वेगवेगळ्या गरजेतून तिनं योगासनं, ब्रह्मविद्या, निसर्गोपचार, ॲक्युप्रेशर... असे वेगवेगळे कोर्सेस केले. स्क्रिन प्रिंटिंगच्या कोर्समधून तर त्या दोघांचा व्यवसाय उभा राहिला. तो त्यांनी अनेक वर्षे चालवला. हातात घेतलेली प्रत्येक गोष्ट ती त्यात समरसून करते. पण त्यात अडकून राहात नाही. जगण्यातल्या रिकाम्या जागा तिनं ड्रॉइंग, कविता, शिवणकाम, विणकाम, मण्यांच्या महिरपी, पेपर क्विलिंग.. असे विविध प्रकारचे छंद जोपासून भरून काढल्या. बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धेत भाग घेऊन तिनं पहिला नंबर मिळवला होता.

निवृत्तीनंतर तिच्या मिस्टरांनी पक्षी निरीक्षणाचा कोर्स केला. तिनं केला नाही. पण पक्षी निरीक्षणासाठी ती भारतभर सगळीकडे त्यांच्याबरोबर जात असते. फोटो, व्हिडीओ शुटिंग करण्यातला आनंद मिळवते. प्रवासात ती फक्त पक्षी निरीक्षण करत नाही तर एकूण निसर्ग, त्यातल्या घटना, माणसं सगळ्यांचंच निरीक्षण करते. स्वतःचा वेगळा दृष्टिकोन, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता असल्यामुळे ती सर्व 'दृश्यां'मधली सूक्ष्मता अनुभवू शकते. या प्रवासांमधले असे अनुभव तिनं तिच्या शैलीत लिहून काढले. श्री गोरे यांनी काढलेले दुर्मिळ पक्ष्यांचे असंख्य फोटो आणि प्रवासातल्या अनुभवांचं 'धावतं वर्णन' शैलीतलं प्रतिभाचं लेखन असलेली दोन ई-पुस्तकं ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीनं प्रकाशित झाली आहेत- 'पक्ष्यांचे नंदनवन सिक्किम' (याचे ऑडिओ बुक सुद्धा झाले आहे) आणि

‘देवभूमीचे पक्षीवैभव’. या दोन्ही ई पुस्तकांना भरघोस प्रतिसाद मिळतो आहे. त्याच्या प्रिंट कॉपीज कुठे मिळतील अशी विचारणा होत असते.

ई पुस्तकांच्या या अनुभवानंतर आता तिनं वेळोवेळी लिहिलेल्या कवितांचंही ई पुस्तक व्हावं असं तिच्या मनानं घेतलं. तिच्या कविताप्रवासाविषयी तिनं सविस्तर आणि प्रामाणिक मनोगत लिहिलं आहे. तिनं आनंद घेतलेल्या अनेक गोष्टींमधली कविता ही एक गोष्ट. हा कवितासंग्रह करताना ‘मी फक्त टिंब...’ अशी तिची धारणा आहे. तेच या कवितासंग्रहाचे शीर्षक आहे. या संग्रहाच्या मुखपृष्ठावरचं सिक्किममधील निसर्गाच्या भव्यतेचं दर्शन घडवणारं सुंदर छायाचित्र तिनंच काढलेलं आहे. आणि या भव्यतेच्या पार्श्वभूमीवर स्वतःचं बिंदूमात्र अस्तित्व दाखवणारं बारीक ‘टिंब’ही छायाचित्रावर तिनंच कलात्मकतेनं रेखलं आहे. वेगळा विचार, स्वतःचा स्वतंत्र दृष्टिकोन हे तिचं वृत्ती-वैशिष्ट्य तिच्या काही कवितांमधेही दिसतं. तिच्या मला आवडलेल्या कवितांची काही उदाहरणं-

‘दगड पुजतो, दगड होऊन
दगडी चैतन्य, यावे कैसे’ (देहाच्या देऊळी)

‘परमेश्वरा, तुझी लीला खरंच खूप अगाध आहे आणि
खरं म्हणजे तू चॅप्टर आणि वस्तादही आहेस’ (आनंद)

‘धन्यवाद! परमेश्वरा धन्यवाद!
मी मांडलेला खेळ
तू ठायी ठायी उधळत आलास’ (धन्यवाद)

या ओळींमधले मर्म कळण्यासाठी या कविता मुळातून पूर्ण वाचायला हव्यात. प्रतिभाच्या आधीच्या ई पुस्तकांप्रमाणे या पुस्तकालाही रसिकांची दाद मिळू दे ही हार्दिक शुभेच्छा.

-आसावरी काकडे
‘सेतू’ डी १/३,
स्टेट बँक नगर, कर्वेनगर, पुणे ४११०५२
फोन: ९७६२२०९०२८ व ९४२१६७८४८०

मनोगत

साधारण कॉलेजच्या पहिल्या पहिल्या दिवसात एखाद दुसरी कविता केलेली स्मरते आहे. परंतु वही करावी असे कधी सुचले वा समजलेच नाही. तेव्हापासून आत्ताआत्तापर्यंत असेच चालत राहिले. कविता लिहून ठेवणे कृतीत उतरले नाही. नंतर मुलं लहान असतानाच्या काळात काही कविता लिहिल्या गेल्या. परंतु त्यांचीही जपणूक केली गेली नाही. पुढे मुलांचे गुण लक्षात आल्यावर त्यांना सपोर्ट करायचा विचार केला, पण तेही परिस्थितीजन्य कारणानुसार जमले नाही.

पुढे मोठ्यांची रिटायरमेंट, वास्तूशांत, मुंज, मुलांची लग्नं, डोहाळे जेवण अशा निमित्ताने बरेच लिखाण केले, परंतु तेही असेच..... जतन करून ठेवले गेले नाही. प्रत्येक कवितेचा श्रोता आमच्या सासूबाई. त्यांच्याच सत्तरीच्या निमित्ताने त्यांचा पुरा जीवनपट कवितेतून मांडला आणि सासऱ्यांनी व्हेरिगुड म्हणून दाद दिली. पुढेही कविता चिटोऱ्यांवर होत राहिल्या तशा नाहीशा सुद्धा झाल्या. एक दिवस त्या पोटतिडकिने म्हणाल्या, "आपल्या जवळ गुण आहेत, त्याच्यावर मेहनत घ्यावी की थोडी. घरात मोठी बहीण आहे कविता करणारी, तिला विचार आणि कर काही तरी. आम्ही घरात आहोत. त्याचा उपयोग करून घे." तरी पण काही घडले नाही. त्याचे असे आहे की प्रत्येक गोष्टीला वेळ यावी लागते.

पुढे मुलं मोठी झाली. लग्न झाली. मोठी माणसं आता या जगात नाहीत. घर रिकामं, वेळ रिकामा... आणि मुलांचे जुने फोन हातात मिळाले. अंगवळणी पडले. तसे आजीच्या म्हणजे सासूबाईंच्या शब्दाला परत जाग आली. मग ती वेळ येऊन ठेपली. तशी ताईला म्हणाले, "बघ एखादा साहित्यिक ग्रुप असेल आणि शक्य असेल तर मी जॉईन होते. फक्त तुझी ओळख देऊ नकोस. मैत्रीण आहे असे सांग." झाले, 'साहित्यनाद' या व्हॉट्सॲप ग्रुपवर नाव आले, प्रतिभा गोरे. कवितेच्या इ-बुकचे बीजारोपण झाले. तिथे सना, मोना, उर्मिला, रेखा आणि बरीच लोकं भेटली. चित्र, शब्द, ओळी, असे विषय ग्रुपवरच्या प्रत्येक सदस्याने द्यायचे, त्यावर कविता करायच्या, असे उपक्रम सुरू झाले. बऱ्याच शंका येत गेल्या

आणि त्यांचे निरसन सुद्धा होत गेले. गोष्टी समजत गेल्या. कविता होत गेल्या. एक नात आली, पाठोपाठ दुसरी येणार अशी चाहूल लागली तशी एक कविता सुचून गेली. ती बारशाला म्हणावी असे मनाने घेतले. उर्मिलाताईंजवळ विषय काढला. त्यावर त्यांनी भली मोठी वृत्तं असलेली यादी पाठवली आणि सुप्त इच्छा आकार घेऊ लागल्या.

'येणार बाळ तान्हा, येणार बाळ तान्ही' ही कविता लय म्हणजे लय भारी झाली. ती आमच्या माईनी सुरेल आवाजात म्हणून दाखवली. खूप कविता साठत गेल्या. एव्हाना उर्मिलाताईंनी गझल सुध्दा चार तासांचे परिश्रम घेऊन शिकवली होती. आता ई-बुकला पोषक सर्व सोयी सहज उपलब्ध होत होत्या. वयाच्या साठीपर्यंत तीन नाती आल्या. त्या निमित्ताने काही प्रासंगिक कविता होत गेल्या. 'साठीला फोन देणार आहे तुला' असं भाऊ ओझरतं बोलून गेला होता. पण त्याचे तेव्हा महत्त्व कळले नव्हते. बारशाच्या निमित्ताने फोन मिळाला, व्हॉट्सॲप मिळाले, कवितेला रंगमंच मिळाला. वेळ तर घरात पाणी भरत होता. आणि अचानक फोनच्या अंगात आले. झाले. सगळा खेळ संपुष्टात यायची चिन्हं स्पष्ट होऊ लागली. आणि ताईने सल्ला दिला. फोन बंद पडायच्या आत सर्व डायरीत उतरवून ठेव. माईने डायरी दिली. सर्व फोन डायरीत उतरवून झाला आणि डायरी कपाटात पडून राहिली. पुढे पाठोपाठ फोन मिळत गेले. पण नवीन फोनला मराठी नाही. ग्रुप सोडला. कवितेचा स्रोत संपला. कविता संपल्या.

आज कवितासंग्रहाच्या उद्देशाने डायरी कपाटातून बाहेर आली. ७५ कविता सापडल्या. टाईप झाल्या. आमची माई कवितांच्या प्रेमात पडली आणि त्या कवितांची झाली गाणी. इतके होईस्तोवर वयाची सत्तरी पार झाली. त्यानुसार परिस्थिती बदलत होती. वयाने आपले रंग दाखवायला सुरुवात केलीय. जीभ जड होते आहे. तिला आता काही तरी आधार हवा असे वाटू लागले आणि एक विचार चमकून गेला. दुसऱ्यांनी कुणी का गावं? मीच का नाही? हे पण मला वेडीला आत्ता सुचलं. ताई जवळ कविता शिकून झाली. ती माईनी गावी हा माझा हट्ट. पण आजकाल ती नसते बरी. तिच्या मागे तरी किती लागणार ना? मग मीच गायचे मनावर घेतले. आमच्या आजीने एक कविता केली होती. तशी माझी आत्ताची अवस्था. तिच्या कवितेत एक माणूस सगळ्यांना राम म्हणायला सांगायचा. तर तो माणूस एका धनगराच्या मागे लागला राम म्हण आणि तो काही म्हणायला तयार होत नव्हता.... तशी मी सगळ्यांना माझी कविता म्हण, माझी कविता म्हण, म्हणून मागे लागत

होते. आणि आता परिस्थिती अशी आहे की मीच गायचे मनावर घेतले. माईला किती वेळा म्हणाले तर तिनं केलं दुर्लक्ष. ताईनंही.... मी लहानपणीसारखं म्हटलं गेलात उडत. नकाच म्हणू.

आता माझ्या कविता आणि मीच गायिका असा ध्यास घेतला. मला आता गायचे आहे आणि आज एक गंमत आठवली. सिक्किमचे पुस्तक लिहिले त्यावेळी सेम सगळे असेच घडले होते. मोबाईल कॅमेरा बंद पडला. म्हणून समोर दिसले ते भराभर लिहून काढले. लॉक डाऊनच्या काळात पुस्तक प्रक्रिया अशीच गतिमान होऊन ई बुक लोकांना वाचायला मिळाले. आजकाल निवांत वेळ मिळतो आहे. तो कवितासंग्रह निर्मितीला पूरक होतो आहे आणि माझ्या गाण्याच्या इच्छेने जोर पकडलाय. आवाजाला गती मिळते आहे. हे सगळे इतक्या द्रुत गतीने घडत गेले की त्या अर्थाची कविता लिहिली गेली. त्या वेळेला जशा भावना अनावर झाल्या आणि अश्रू ओघळले, तसाच हाही अनुभव. गाण्याचा लागलेला ध्यास आणि ध्यास म्हणून लिहिली गेलेली कविता! ती कविता शुद्ध लेखन लिहितात ना तितक्या सहजपणे लिहिली गेली आणि शेवटच्या शब्दाला गाडी अडली. पण लेखणीला इतकी गती होती की शब्दाच्या जागी ..... अशी टिंबं ठेवून मी मोकळी होणार, इतक्यात टिंबांच्या ऐवजी टिंब हा शब्दच योग्य असल्याची जाणीव झाली. आणि क्षणाचीही उसंत न घेता मी ती कविता गाऊनही घेतली. तेव्हां छातीत, पाठीत, मस्तकात जे काही झाले, ते मला आणि माझ्या पाठीस लागलेल्या त्या शक्तीलाच ठाऊक! मी फक्त टिंब, हो ना? मी फक्त टिंब, हो ना? ... आणि अलगद डोळ्यातून अश्रू ओघळले... एका आवेगात लिहिलेली ती कविता-

ध्यास

ध्यासात गायनाच्या, कार्यात उतरलास
सक्रीय होऊनी का, पाठीस लागलास?

धरिलास हात माझा, शब्दात उतरलास
कंठात येऊनी का, तालात गायलास?

घेऊन बासरीला, यावेच वाटले ना?
साथीत बासरीच्या, गावेच लागले ना?

किमया हि कोणती रे, ठाऊक ती तुला ना?
ही तुझीच इच्छा, मी फक्त टिंब, हो ना?
***

यातली शेवटची ओळ पुस्तकाचे नाव सुचवून गेली. सिक्कीम मधील मी काढलेल्या एका फोटोवर ते टिंब मूर्त रुपात माझ्या अस्तित्वाचे प्रतिनिधित्व करत विराजमान झाले..!

असा प्रवास करत आजवर लिहिलेल्या कविता "मी फक्त टिंब..." या संग्रहात एकत्रित केल्या आहेत. त्यातील अधिकतर कविता "साहित्यनाद" या व्हॉट्सॲप ग्रुपमधे भेटलेल्या सर्व सभासदांच्या सानिध्यात आणि मार्गदर्शनाने लिहिलेल्या आहेत. उर्मिलाताई बांदिवडेकर यांची विशेष मोलाची मदत झाली. मीरा फडके आणि दिलीप गोरे यांनी प्रुफरीडींगचे काम पाहिले. वैशाली लेले यांनी वेळोवेळी कौतुक करून प्रोत्साहन दिले. सर्वात मुख्य काम सासूबाईंच्या दिशा दर्शनाचे होते. तो आरंभबिंदू होता. कवितासंग्रहाचं स्क्रिप्ट करून त्यांची इच्छा प्रत्यक्षात उतरवण्याचे काम आसावरी काकडे यांनी केले. या सर्वांच्या सहकार्याने तयार झालेला हा कवितासंग्रह सुनीळ सामंत यांच्या ई प्रतिष्ठानच्या वतीने प्रकाशित होतो आहे. सर्वांचे मनापासून आभार.

सौ. प्रतिभा गोरे

अनुक्रम

सुसूत्र सत्ता चाले त्याची 15
झाडे लावा झाडे जगवा 16
पंख वाटा 17
पहाटेची चिवचिव18
बिलगली होती खरी 20
कांचनजुंगा 21
माझ्या विचारांचा भाग नाही 22
मुक्तीत वेदनेच्या 23
देवभूमी 24
अभिषेक 26
प्रवास 27
अष्टभुज रूप 28
शब्द ते प्रबळ, माझेच निव्वळ 29
मैत्री 30
छंद झाले बंद आता 32
नांदला माझ्यामधे 33
देहाच्या देऊळी 34
जोजवते आई 35
जननक्षम देही 36
अर्थवाही शब्द कान्हा 37
ते कर्ज असू दे 38
प्रिये 39
गरिबी 40
निर्मोही मोही झाले 42
बोलतील डोळे 43
आजी आजोबा 44
निसर्ग 45

ही तुझी रे व्दारका 46
येणार कोण सांगा, नेणार त्यास आहे 47
गजरा 48
जिणे व्यर्थ झाले 49
नजर 50
चालती जसेच पाय, तोच जन्म होतसे 51
नादान शिष्य आहे 52
सांजवेळ 53
प्रसन्न मी वसुंधरा 54
अदृश्य नावाडी 55
सार्थ शब्द 56
उन्हाळा हिवाळा, पुन्हा पावसाळा 57
लेखनाचा वारसा 58
सावली 59
रुळ धावती जसे निरंतर 60
आनंद 61
मुखवटा 62
चुगली 63
धन्यवाद 65
करा उत्सव साजरा 66
डोहाळे 67
समजूत 68
निरोप 69
शिकवण 70
उंचावलेल्या टाचांचा मान 71
घुंगूर पाऊल 72
गांभीर्याचे भान 73
आवर तुझा पसारा 75
ट्रोगन पक्षी 76

नवा गडी नवं राज्य 78
विश्वास 79
हिरवाई 80
वितळुनी मिसळले जेव्हां 81
तहान 82
तिन्हीसांजा 83
सोबत 84
झाली तुझी पन्नाशी 85
कधी कधी 87

सुसूत्र सत्ता चाले त्याची

माहित आहे शुभ शकुनांचे
इथले दरवळ कोणी नेले
त्यात मिसळुनी जीवन सारे
ओंजळ माझी भरून गेले

माहित आहे माझ्या साठी
कोण कुठे ते अविरत झटते
म्हणून मी नतमस्तक होउन
अनामिका त्या अखंड स्मरते

अनामिकाचा अखंड वावर
जगात साऱ्या चालत राही
कसा कोठला हिशोब त्याचा
कोणालाही उमगत नाही

कसा कोठुनी येतो कोणी
जातो येथे सहज गुंतुनी
सहज तयाला स्मरण देउनी
बोट तयाचे धरतो कोणी

माहित आहे अखंड सत्ता
साऱ्या जगतावर कोणाची
सूत्रधार तो या जगताचा
सुसूत्र सत्ता चाले त्याची
***

झाडे लावा झाडे जगवा

सळसळ वड हाले बोलला काय जाणे
खडखड कर गाडी धाव घेई गतीने

टकमक बघणाऱ्या सूर्यबिंबास लाली
सरकत वर येता ऊब वाटेत आली

नमन कर जरा तू दाट झाडी बनावी
पटपट बिज पेरा रोप लावा मनानी

सतत सतत ध्यानी व्यग्रता ती असावी
दिनकर बुडताना झोप घ्यावी सुखानी

तर मग उठ आता आळसाला पुराया
क्षणक्षण कण वेचा काम आधी कराया
***

पंख वाटा

आज पुन्हा साद आली मोडक्या घरट्यातुनी
संगतीने तो तिच्याही नाचला झाडावरी

शुभ्र धागे कापसाचे चिमण गाणी रंगली
पंख वाटा दृश्य झाल्या उतरल्या झाडावरी

चिमणपंखी वावराला वेग आला छानसा
बंध त्यांनी रेशमांचे गुंफले झाडावरी

हाय तो आला कसा अन् बैसला घरट्यावरी
राम प्रहरी स्तब्धता का नांदली झाडावरी?

काय तो संकेत आहे ईश्वराचा या जगी?
का पुन्हा निःशब्दता ती पसरली झाडावरी ?
***

पहाटेची चिवचिव

बीज रुजता मातीत
झाले झाले त्याचे रोप
रोप वाढले वाढले
त्याचे झाले दोन हात

झाले चार आणि सात
वृक्ष आला बहरास
आला आला पावसाळा
झाले पक्षीगण गोळा

त्यांच्या वावरात नित्य
मन रमुनिया जाते
येता जाता तिथे माझी
कशी नजर धावते

आला आला चष्मेवाला
तिच्या सवे वृक्षावर
काडी काडी जमवून
झाले घरटे तय्यार

सज्ज झालो आम्ही दोघे
हाती घेतले कॅमेरे
पहा पहा कसे आम्ही
चलच्चित्र पकडले

आली शोभा खिडकीस
नांदे आनंदे पक्षीण
झाली चिव चिव सुरू
गेले उडून पाखरू

पक्षी येती गाती जाती
ओढ जीवास लावती
पहाटेची चिवचिव
त्यांची गाणीच भासती

नित्य उभे खिडकीत
कसा चाळाच लागला
त्यांच्या संगतीत आम्ही
पहा जीव रमवला
***

बिलगली होती खरी

थेट मजला पाहण्याचा, धीर ना झाला जरी
मी खुळा का हासलो, ती हासली होती खरी

मी दिले ते घेतले का? समजले नाही तिला
मी दिले ते घेत गेली, देत गेली ती खरी

माहिती नाहीच काही, भेटलो होतो तिला
भेट झाल्या त्या क्षणांनी, लाजली होती खरी

वाटले का ते मनाला, भेट ती घ्यावी तिची
ते तिलाही वाटले नी, भेटली होती खरी

बोलणारा मीच होतो, बोलवावे मी तिला
हात माझ्या देत हाती, देत गेली ती खरी

बाप माझा खाष्ट आहे, बोलली अन् ती मला
ये घरी तू बोल काही, बोलली होती खरी

मी घरी गेलो तिच्या, ती हासली होती तशी
हाक देता धावली अन बिलगली होती खरी
***

कांचनजुंगा

सिक्कीम यात्रेत, गवसला आम्हा
अक्षयसा भाता, पाखरांचा

सुरेख रंगीत, सिक्किमचे पक्षी
त्यांचे आम्ही साक्षी, झालो आहो

प्रवासाचे क्षण, अनुभवा आले
शब्दात ओवले, तुम्हासाठी

ओढ अनावर, कांचनजुंगाची
अनुभवा आली, सुकृताने

कांचनजुंगाचे, घेऊन दर्शन
तृप्त होता मन, परतलो
***

माझ्या विचारांचा भाग नाही

तुझीच पेरणी, तुझीच रुजणी
तूच द्यावे पाणी, वेळोवेळी

मी सुद्धा नुसती, पाहिन दुरून
करेल वरून, विश्वास हा

पसारा तुझाच, आवरावा तूच
दखल मुळीच, देत नाही

तुझाच बगीचा, तुझी फळे फुले
तुझी आम्ही मुले, आनंदीच

तुला हवा तसा, फुलव बगीचा
माझ्या विचारांचा, भाग नाही
***

मुक्तीत वेदनेच्या

एकेक रोज आता, जाणार दात आहे
माझ्याच त्या भुकेचा, होणार घात आहे

काळीज पोखरे का, ते प्रेम जास्त आहे
होईल काय बाई, साशंक नात आहे

खाणार काय आता, हा प्रश्न रोज आहे
देहास पोसणारा, तो भात एक आहे

ना वेदना मुखाला, जाणीव आज आहे
मुक्तीत वेदनेच्या, मी गीत गात आहे

रात्रीस सोबतीला, येणार कोण आहे?
शांतीत झोपण्याची, ती रात्र आज आहे
***

देवभूमी

कसे कुठे जावे, केली शोधाशोध
जेथे तुंगनाथ, देव आहे

मार्कण्डेय ऋषी, तपोभूमी त्यांची
महती क्षेत्राची, सर्वदूर

देवभूमीच्या या, मक्कुमठ क्षेत्री
पक्षीमित्र यात्री, येती जाती

मक्कुमठ क्षेत्री, येण्याचा आनंद
बोलला मिलींद, मला पण

पक्षीमित्र नेगी, तेथेच राहतो
सोयही पाहतो, राहण्याची

देवभूमीत या, वैभव पक्ष्यांचे
पाहता साऱ्यांचे, मन तृप्त

उन्हाळा संपून, पुढच्या थंडीला
परतुनी या ना, नेगी बोले

मिलींद मानसी, सोबत अदिती
बरोबर आली, यात्रेसाठी

खूप उंचावर, तुंगनाथ देव
बर्फाचा वर्षाव, सुरु झाला

तापमान होते, शून्यावर गेले
थैमान थंडीचे, सोसवेना

साठवण पाणी, प्यावयाचे पाणी
नळाचेही पाणी, गोठलेले

अनुभव सारे, थंडीचे घेतले
मन सुखावले, पाहताना

हरपले मन, डोंगर दऱ्यांचे
सौंदर्य बर्फाचे, टिपताना

अवधीत थोड्या, पक्ष्यांचे वैभव
लुटून श्रीमंत, झालो आम्ही

वैभव पक्ष्यांचे, घेऊन कवेत
पोचलो पुण्यात, दावावया
***

अभिषेक

शेतकरी अनावर
दूध ओतीतो मातीत
माती होईल गे आता
त्याच्यावरती प्रसन्न

माती दुधानी नाहली
शांत अंगाची काहिली
दोन्ही हाती देती झाली
आशीर्वाद त्याच्यासाठी

अभिषेक झाला मला
काय हवे सांग मुला
तुझ्यासाठी रिक्त केला
सारा पदरीचा ठेवा
***

प्रवास

येता हाक जशी तसेच पळतो, त्यांच्या सवे राहतो
बॅगा त्या भरल्या तशाच असती, दोघे असे धावतो

कॅमेरा धरता हातात चरणी, उत्साह संचारतो
पक्ष्यांच्या दुनियेत जास्त करुनी, दोघे असे हिंडतो

त्या साऱ्या गरजा तशाच असती, त्यांना तसे पाहतो
त्यांच्या त्या जिरती तशाही सरती दोघे असे रंगतो
***

अष्टभुज रूप

नवस सायास, नको नमस्कार
नाही पावणार, सांगतसे

म्हणे पाठीराखा, आहे माझा देव
अंतरीची ठेव, लाथाडतो

करावा ओंकार, आणि प्राणायाम
ध्यान धारणेस, अंगिकार

चैतन्य मुरारी, बसलेला आत
अष्टभुज रूप, दाखवेल
***

शब्द ते प्रबळ, माझेच निव्वळ

पळभर सुद्धा, विसावेना शब्द
वाटे मज क्षुब्ध, झाले काय

किती वेळ झाला, बोलाविते त्यांना
अजून येईना, काय करू

थांब थोडी मला, सदा म्हणतोय
सांगतो येतोय, येईच ना

किती गेला वेळ, किती तळमळ
शब्द अवखळ, झाकोळले

लिखाण सबळ, वाटले केवळ
तरी ते ढोबळ, होत आहे

आला आला क्षण, शब्द ते प्रबळ
माझेच निव्वळ, झाले सारे

पेळूतून सूत, निघताना जसे
वाटते ना तसे, झाले आहे
***

मैत्री

कित्येक दिवस
उलटून गेले
एकमेका डोळे
भेटले ना

आसुसले मन
कासावीस भोळे
थकलेले डोळे
भासतात

साहवेना भार
ओलावले डोळे
म्हणून घातले
वाळत का?

वाळत घालून
वाळणार नाही
भेट होता पाही
वाळतील

दूर देशी होता
अडकला मित्र
करोनाचे सत्र
संपेच ना

संपली संपली
करोनाची भीती
प्रतीक्षेची मिती
संपुष्टात

गळा भेट होता
ओलावती पुन्हा
ओलेचिंब त्यांना
राहू देत
***

छंद झाले बंद आता

छंद झाले बंद आता, दिवस वाया चालला
शब्द स्रोतांचा उमाळा, तोच आता आटला

सावलीला थांबुनी, होता विसावा घ्यायचा
हाय दैवा हा कुणी रे, वृक्ष आहे छाटला ?

विठ्ठलाच्या दर्शनाने, जीव झाला शांत हा
भाव भक्तीचा शहारा, का मनासी वाटला?

वावडीचा काच दोरा, लाल रंगाचा बरा
उंच आकाशात जाता, तोच गेला काटला

प्रसुतिच्या मग वेदनांना, माय गेली विसरुनी
पाहता बाळास हृदयी, प्रेम पान्हा दाटला
***

नांदला माझ्यामधे

कोणती चाहूल नाही
स्पर्शही ना लाभतो
पण मनाला वाटते तो
नित्य सोबत चालतो

तो दयाळू सर्वसाक्षी
तीर्थक्षेत्री त्रिभुवनी
चालते आहे कधीची
चालवीता तो धनी

वाहतो आहे अनादी
अमृताचा तो झरा
खोल तृष्णा त्रिभुवनाची
शांत करण्या ती धरा

व्यापकाला सानुल्याशा
बांधुनी नावामधे
आळवीता मी तयाला
नांदला माझ्यामधे
***

देहाच्या देऊळी

बोलवाया हरी, येत असे रोज
कोणी नाही जात, त्याच्या सवे

चालवितो हरी, धरूनिया बोट
आडमुठे मन, जात नाही

अंतरात आहे, कैवल्य उधाण
कवाड बंदिस्त, केले का रे

चैतन्याची आस, मोकलून खास
दगड झालास, का रे ऐसा

दगड पुजतो, दगड होऊन
दगडी चैतन्य, यावे कैसे

ना करी व्यायाम, नाही प्राणायाम
ना ध्यान धारण, अकारण

देह तुझा आहे, चैतन्य मंदिर
पहावा आतच, वास त्याचा

ओळखून त्यास, पुजावे आतच,
आतले वास्तव्य, काय वर्णू

ओंकार साधने, प्राणायामा योगे
तेज पेशीतले, वाढतसे

देहाच्या देऊळी, आत्मा वसतसे
तेज तेथे दिसे, निरंतर
***

जोजवते आई

बाळ तान्हुले घरात अपुल्या खेळवते आई
न्हाऊ माखू घाली बाळा जोजवते आई

कधी अशी तर कधी तशी ती बाळा सांभाळी
कोडकौतुके करीत सारी वाढवते आई

कुशीत शिरता बाळ तियेच्या आनंदी होई
बाळ झोपता दिवे रातीला मालवते आई

समाधान त्या वदनावरती झळकत ते राही
तृप्त जीवनी सदा अशी ती जाणवते आई

सावरून ती घरास अपुल्या मोक्षपदा जाई
होउन वारा सदैव घरभर वावरते आई
***

जननक्षम देही

जननक्षम देही, तेज ते जन्म घेई
दिव्य त्या क्षणाला, तो देह दिव्य होई

माउली घडवी बाळ, पाजून प्रेम पान्हा
पान्हा पिऊन बाळ, घडवी माउलीला

खेळात जीवनाच्या, आमंत्रित मी होते
कितीक खोल श्वास, तेजस्वी होत होते

रोज नवी पहाट, नव्याने आमंत्रण
जीवन सारीपाट, नवीन ते अंगण

जे दिले जीवनाने, ते स्विकारीत गेले
त्यानेच दिले मजला, सामर्थ्य माऊलीचे
***

अर्थवाही शब्द कान्हा

खेळ खेळतो शब्दांशी
शब्द येती पाठी पाठी
झुला झुलतो मनात
कविते ग तुझ्यासाठी

कविते ग तुझ्यासाठी
रोज फुटे मला पान्हा
काटाकाटी शब्दासाठी
शब्द शब्द होतो कान्हा

शब्द शब्द होतो कान्हा
खेळ खेळून झोपतो
लडिवाळ माझा तान्हा
मधूनच जागा होतो

मधूनच जागा होतो
खेळे लपंडाव पुन्हा
पुन्हा पुन्हा घे लोळणा
अर्थासाठी शब्दकान्हा

अर्थासाठी शब्दकान्हा
शब्द शब्द ग चढती
शब्दमाठ फोडी पुन्हा
अर्थवाही शब्द येती

अर्थवाही शब्द येती
कविते ग तुझ्यासाठी
झुला झुलतो मनात
शब्द येती पाठी पाठी..! ***

ते कर्ज असू दे

ते कर्ज असू दे सतत मला रे आता
तू जगन्नियंत्या बुध्दी शक्ती दाता
दे बुध्दी आता सतत तुझ्या स्मरणाची
हो प्रवास माझा सतत सत्य मार्गानी
***

प्रिये

रुसून राहतेस का? बसून पाहतेस का?
हसून टाळतेस का? वळून हासतेस का?

रडून तू पुन्हा अशी, हसून लाजतेस का?
जरा तरी मनातले? मलाच सांगतेस का?

कशास लाजतेस तू? मनास मारतेस का?
मिठीत ये अशी प्रिये, जिवास जाळतेस का?

पुन्हा पुन्हा आसवे, अशीच गाळतेस का?
मला बघून भेट तू, उगाच टाळतेस का?

मजा अशा वयातली, उगाच ताणतेस का?
घरीच भेटतो उद्या, मनात ठेवतेस का?
***

गरिबी

ना कधीही लाज मजला, वाटली होती खरी
जन्मलो गरिबीत मी, अन् वाढलो गरिबापरी

अन्नदात्री तीच माझी, आज आहे माय ती
तारिले आहे तिने या, जीवनी मजला तरी

गीत गावे मानवाने, लाख मोलाचे असे
सांग ना तू जीवनाची, ही कहाणी आहे बरी

वाटतो अभिमान मजला, रे दयाळा जीवनी
दाखवी तू मार्ग मजला, चालवी तू श्रीहरी

लोभ नाही हाव नाही, तृप्तता आहे इथे
शांत चित्ते झोप घेतो, झोपडी माझी जरी

कष्ट करणे देव पूजा, हे आम्हाला माहिती
ना कधीही ना कुठेही, ती कुणाची चाकरी

बाजरीचे शेत होते, पाटपाणी त्या तिथे
भोजनाला रोज होत्या, बाजरीच्या भाकरी

गार वारे गीत गाती, बासरीची धून ती
झोपडीशी येत होत्या, त्या सुखाच्या घागरी

बैलगाडी बैलजोडी, मी नि माझी बायली
बाप आई चार लेक नि, एक होती छोकरी

राबता ही झोपडीशी, माणसांचा तो असा
येत होते जात होते, भरून जाई ओसरी

माय सांगे वाजवाया, आवडीची धून ती
बाप माझा वाजवितो, श्रीहरीची बासरी
***

निर्मोही मोही झाले

धरता लयीस जेव्हां, उतरून गीत झाले
चालीत गात गेले, ते गीत गेय झाले

ऐकून गीत माझे, निर्मोही मोही झाले
श्रोता समोर येता, ते गीत श्राव्य झाले

घेऊन बासरीला, ते दिव्य रूप आले
पावा सुरेल झाला, सुश्राव्य काव्य झाले

वृंदावनात गाई, ते गोप आज जमले
त्या मंत्रमुग्ध गाई, ते गीत धन्य झाले
***

बोलतील डोळे

बोलतील डोळे, मी बोलणार नाही
समजशील सारे, मी सांगणार नाही

वाचशील सारे, मी बोललेच नाही
पाहशील ते ते, डोळ्यात सर्व काही

भाव अंतरीचे, जे बोलतील डोळे
साठवीन सारे, डोळ्यात भाव भोळे

शब्द काय आहे, भावनेत सारे
उधळतील डोळे, भावनाच त्या रे

खोडसाळ डोळे, मग बोलतील काही
जा तुला न आता, मी सांगणार नाही
***

आजी आजोबा

गेले कुठे आजोबा, आजी कुठे दिसेना
नयनात आसवांची, अखंड धार आहे

तू थांब थोडी बाळा, येईल हळुच आजी
घ्यावे कुशीत तुजला, ठरला विचार आहे

दोघी मिळून खेळा, हासा तसेच नाचा
घर हासरे कराया, तुमची जरूर आहे
***

निसर्ग

निसर्गात शक्ती स्वयंभूच आहे
सुबुद्धी सुबत्ता निसर्गात आहे

न संपेल ती ना अपुरी पडेल
गुणाकार ऐसा पुन्हा तो घडेल

वजा बेरजेच्या गणिती हिशोबा
निसर्गात चाले सदा तो घरोबा

निसर्गातले सर्व काहीच घ्यावे
तयाचे तयाला पुन्हा द्यावयाचे

उन्हाळा हिवाळा पुन्हा पावसाळा
निसर्गात चाले असे कैक वेळा

न हाती तयाने दिले मानवाच्या
निसर्गात आहे असा एक साचा

स्विकारीत जावे निसर्गास त्याने
न काही करावे स्वतःच्या मनाने

निसर्गास ना मान्य करणी मनूची
निसर्गात सत्ता सदा ती प्रभूची
***

ही तुझी रे व्दारका

तू न आहे मी न आहे, सांग आहे कोण रे?
तूच आहे आत माझ्या, चालणारा हो न रे?

तूच आहे पाहणारा, बोलणारा आतला
मग उगा का बोलतो रे, मी न आहे त्यातला?

ठाउकी आहे मला रे, तूच करविता सारखा
अंतरी वसशी असा की, ही तुझी रे व्दारका

सांग तू रे मी न येथे, मी न तेथे मान्य का?
सांगते मी आज आता, ऐक देवा अन्यथा
***

येणार कोण सांगा, नेणार त्यास आहे

सत्याकडे पुन्हा मी जाणार आस आहे
येणार कोण सांगा नेणार त्यास आहे

बोलावितो मला तो जाणार सत्य आहे
सत्यामधील दुनिया नक्कीच खास आहे

त्याला कशी न जाणो माझीच ओढ आहे
अन् अंतरात माझ्या त्याचाच वास आहे

जावे कसे कळेना नेण्यास येत आहे
वेड्या मनास माझ्या त्याचाच ध्यास आहे

डोळे मिटून आता ध्यानात मग्न आहे
देवा तुझाच माझ्या हृदयी निवास आहे
***

गजरा

प्रेम भरल्या कौतुकांचे, तेच गजरे माळले
ना कधीही मोगऱ्याला, माळुनी मी पाहिले

रोज होते विणत गजरे, रोज होते विकत ते
कोण कोणा देत होते, कोण कोणा माळते

भेटला ना माळणारा, वेळ नाही भेटला
वाटले ना भेट घ्यावी, भेट व्हावी ती मना
***

जिणे व्यर्थ झाले

पहाटे पहाटे, कशी जाग आली
मला सांग आता, कशी काय भ्याली

तुला काय झाले, अशा या अवेळी
असे का ग केले, सकाळी सकाळी

वयाच्या हिशोबी, अशी वाग थोडी
मला वाटते लागली, काय खोडी

आधाराविना तू, नको चालू ऐशी
असा हट्ट का तो, तुझी खोड कैशी

असे का न वाटे, मला बोलवावे
अबोला असा का, मला टोलवावे

तुला काय त्याचे, मला काय वाटे
रडाया असे गे, मनी काय दाटे

उगा हे जिणे व्यर्थ, झालेय ओझे
तुला काय त्याचे, मला तेच ओझे

निघाले त्वरेने, जिवाच्या भितीने
नको येऊ मागे, कुणाच्या वतीने

मला आज त्याचे, निमंत्रण मिळाले
म्हणोनी निघाले, त्वरेने त्वरेने
***

नजर

नजर माझी सहज गेली हासऱ्या धरतीवरी
थेंब ओले ते दवांचे नाचले गवतावरी

हे मणी मज वाटती का पसरले त्याने तसे
भासले मजला असे का उतरले तारे जसे

सढळ हाताने कसे ते ओतले सारे जरी
मानवासाठीच त्याने दान का द्यावे तरी

हिरवळीवरलेच मोती मी कधीची वेचते
वेचलेले तेच मोती मी जगाला वाटते

वेचल्या मोत्यात आता वाटतो ना रस मला
झडकरी घेऊन जा तू सांगते रे मी तुला
***

चालती जसेच पाय, तोच जन्म होतसे

पाय वाट चालती, तिच्या सवे जिथे जिथे
चालतो जरी तसेच, नेत ती जिथे कुठे

सोबतीस राहशील, तू सदा अशी सवे
धन्यवाद गे बये, तुझे तरी मानू कसे?

एकटीच राहतेस, तू तरी अशी कशी?
एकटी न मी इथे ग, सोबतीस त्या किती

तापतोय सूर्य तोच, तापतेस तू जशी
थंडगार या हवेत, थंडगार ही तशी

चालती जसेच पाय, तोच जन्म होतसे
हिरवळीत वाट तीच, स्पष्ट होत जातसे

मुख्य मार्ग दाखवून, थांबलीस तू इथे
साथ आज सोडतोय, बायबाय गे सखे
***

नादान शिष्य आहे

होती चुका जरी का, कोणास त्या कळाव्या
शोधून सांगणाऱ्या, गुरुलाच त्या दिसाव्या

पाहून योग्यता ही, घेई समीप त्यासी
नादान शिष्य आहे, ठाऊक हे तयासी

शिष्यास ना कळावे, येई कसा कधी तो
ना मागताच काही, झोळी भरून देतो

पाहून काळ वेळा, शिष्यास रोखतो तो
अडवून वाट त्याची, ध्येयासमीप नेतो

हातात हात घेतो, शिष्यास चालवीतो
सान्निध्य त्या गुरूचे, विश्वास वाढवीतो

सच्चा प्रयत्न व्हावा, उत्कर्ष साधणारा
एकेक पायरी मग, शिष्यास उचलणारा
***

सांजवेळ

सांजवेळी चालतांना, वाट ती होती मुकी
हात हाताला मिळाला, साथ ही झाली सुखी

सांजवेळी चालतांना, मोद तो वाटे किती
हात हाती घेतला मग, संपली सारी भिती

स्वर्णरंगी भास्कराची, साथ होती ना खरी
शुभ्र लाटा धाव घेती, सूर्य पकडाया करी

थांबले ना पाय दोघे, चालती तालावरी
साथ द्याया एकमेका, भेटले सागरतिरी
***

प्रसन्न मी वसुंधरा

धान्य रास फेकतोस, तू अरे उदास का?
दुग्ध धार ओततोस, रे अशी मिजास का?
रे तुला विचारतेय, मी तुझी वसुंधरा

सोडतोस आस का, उगा गळ्यास फास का?
ध्यास घे जरा मनास, बोलली वसुंधरा
सांगते तुलाच मी, अरे तुझी वसुंधरा

गवत घास तू दिलास, गो धनास भू धरा
गाय बोलली मला, धरेस का न दे जरा
दुग्ध स्नान घालतो, प्रसन्न हो वसुंधरा

शेत शेत पोसतेस, तू अशी वसुंधरा
घास दे वसुंधरेस, शेत बोलले मला
दुग्धपान करविताच, मी तुला वसुंधरा

खास दास मी तुझाच, पावसास बाहतो
जीवना भकास या, अता झकास पाहतो
प्रार्थितो तुला असा, वरद करास मागतो

गाळलास घाम तू, प्रसन्न मी वसुंधरा
राबणार मी अता, हाच नेम सर्वथा
धान्य घेतले झकास, आज मी वसुंधरा

रास रास धान्य खास, तू दिले वसुंधरा
धन्यवाद हे तुला ग, माय बाप बोलले
रे कशास धन्यवाद, मी तुला प्रसन्न रे
***

अदृश्य नावाडी

गढूळली नदी | तीत उभी नाव
दूर असे गाव | कैवल्याचे

कैवल्याच्या धामी | आमंत्रण मला
न्यावयासी आला | जगद्गुरु

ताटकळे तीरी | अदृश्य नावाडी
उभी केली होडी | माझ्यासाठी

प्रपंची गुंतले | अज्ञानीच जैसी
मूढ मीच कैशी | जाववेना

समजावे हरी | राहुनी प्रपंची
चिंता नको त्याची | उगा करू

चिंता सोड त्याची | माझ्या चरणासी
नको ती उदासी | त्वरा कर

समजले सारे | उठले तत्काळ
अंगी आले बळ | खरे तेव्हा
***

सार्थ शब्द

ताई तुझे सार्थ शब्द
माई तुझ्या चालीतून
होती असे तालबद्ध
येती माझ्या ओठातून

पडताच कानावर
पदन्यास आपोआप
करताल पाठीवर
कौतुकाची देती थाप

शब्द तुझे कौतुकाचे
उघडती महाद्वार
खुले झाले माझ्यासाठी
शब्दकोशांचे भांडार
***

उन्हाळा हिवाळा, पुन्हा पावसाळा

नभी सावळे रंग, झालेत गोळा
असा या अवेळी, कसा पावसाळा

सुवर्णी किनारा, सफेदीस येतो
दिसे दिव्य शोभा, मना मोद होतो

जमिनीत खाली, असे बीज मेळा
आमंत्रित होता, अता पावसाळा

सवे वादळाच्या, प्रकाशीत रेषा
निसर्गात चाले, अरे तीच भाषा
***

लेखनाचा वारसा

लेखनाचा वारसा तुज, देउनी गेले जरी
माय माझी गात होती, तू तशी आहे खरी

काव्य लेखन गीत गायन, सार त्यांचे जे मनी
देत गेला, घेत गेले, तू तशी आहे खरी

लेखनाला दाद माझ्या, घेउनी मी दाविली
काव्य गीता गाउनी घे, तू तशी आहे खरी

लेखनाच्या गायनाच्या, यातना मी त्या दिल्या
त्या सुखाने घेत गेला, तू तशी आहे खरी
***

सावली

आसपास माझ्या, तुझा नित्य वास
अढळपद राहो, तुझ्या सावलीत

हातास धरून, दाखविसी वाट
ठाव देशील ना, तुझ्या सावलीत

हृदयास माझ्या, तुझा नित्य भास
राहू दे मला रे, तुझ्या सावलीत

तुझे नाम ओठी, तुझी भक्त खास
मला भरवसा, तुझ्या सावलीत
***

रुळ धावती जसे निरंतर

बाळपणीचा, काळ सुखाचा
असे कोणसे, म्हणून गेले

सुख दुःखांच्या, ऊन सावल्या
खेळ असा हा, खेळायाचा

ऊन सावली, उंदिर मांजर
खेळ तयांचा, असे निरंतर

एकशे ऐशी, अंशाचे अंतर
रुळ धावती, जसे निरंतर
***

आनंद

परमेश्वरा तुझी लीला खरंच खूप अगाध आहे
आणि
खरं म्हणजे तू चॅप्टर आणि वस्तादही आहेस
तुला जसं हवं तसंच तू करणार आहेस
याची मला पक्की खात्रीही आहे
आणि म्हणूनच तू दिलेला खेळ
तुला हवा तसाच, मी खेळणारही आहे
कारण खेळात होणारी माझी प्रत्येक हार
म्हणजे तुझा आनंद आहे
आणि त्या आनंदाच्या क्षणांना
मी तुला वंचित करणार नाहीये
कारण आनंद म्हणजे काय?
त्याची चव, मला, तुला दाखवायची आहे
म्हणजे तू तो आनंद सगळ्यांना
मुक्तहस्ते वाटशील
आणि सगळ्यांच्या हृदयात
तुझं असलेलं अढळ स्थान
अढळच राहील
कारण तू पदभ्रष्ट झालेला
मला पाहवणार नाही
तुझ्या विजयासाठी मला
माझी प्रत्येक हार शिरोधार्यच आहे
तुझ्या विजयासाठी मी हरलीय
हा आनंद काही कमी प्रतीचा नाही आहे
***

मुखवटा

सर्व मीही जाणते रे, मुखवटा नाही तुला
जाणती रे जाणणारे, मुखवट्याविनही तुला

मुखवट्याचा हा अडोसा, रे असा तुजला हवा
निर्गुणा रे निराकारा, कार्य करण्याही तुला

व्यक्त व्हावे वाटले तर, मुखवटा तुज कोणता?
मुखवट्याचा शोध घेतो, मुखवटा हा घे तुला

व्यक्त व्हावे वाटले मज, तू असावा आत ना?
त्या क्षणाला झडकरी, लागेल यावेही तुला

पूर्ण तू ना, पूर्ण मी रे, पूर्ण आहे सांग ना?
एकमेकावीन काही, अर्थही नाही तुला

भू धरेचा भार वाढे, अवतरावे लागता
एकमेकाविन न काही, पूर्णता आहे तुला
***

चुगली

निसर्गाने पहा कसा, उत्सव मांडला
पानवेलीचा हिरवा, दारी मांडव घातला

माझ्या बागेत झाली, वर्दळ कर्दळीची
वेळोवेळी येते मला, स्वामींची प्रचिती

ब्रह्मकमळाला आले, मातीतून कोंब
गणरायासाठी बघ, लावली जास्वंद

वाळलेल्या गुलाबाला, येई नव्याने पालवी
मोगरीची वेल बघ, घालते फुगडी

गुलबक्षीचा झिम्मा, चाल त्याची नागमोडी
लाल आळुच्या भोवती, बालकांची लाडीगोडी

आला ओव्याला बहर, छान भज्यांसाठी
कढीलिंबाची फोडणी, सांग कशासाठी?

आळूची भाजी करी, तयारी कशाची?
करा आता कोशिंबीर, कांद्याच्या पातीची

हिरव्या चटणीला, लसणीची पात
पहिलाच हवा म्हणे, मला जिऱ्याचा ग भात

लाडक्या लेकीला आज, रिंगणात धरा
काय घातला गोंधळ, तिलाच विचारा

प्रीती भोजनाची तिला, आली काय सय?
मधुमालतीच्या मनी, आज आहे तरी काय?

उंच उंच वरवर, कशी चढली ती बघ
पानापानांच्या कानात, आज सांगते ती काय?

कशाची ग बाई, तिला लागली चाहूल?
स्वप्नात पाहिले का, तिने घुंगुर पाऊल?
***

धन्यवाद

धन्यवाद परमेश्वरा धन्यवाद
मी मांडलेला खेळ
तू ठायी ठायी उधळत आलास
आणि तुझ्यापासून लांब जाणाऱ्या मला
तुझ्याजवळ घेतलंस

धन्यवाद परमेश्वरा धन्यवाद
तुझ्यापासून दूर जाणारी मी
तुला आवडले नाही
याचा मला खरंच खूप आनंद झालाय
कारण मला समजलंय की
तुझे आणि माझे नाते अतूट आहे
आणि आता मी
कायम तुझ्याबरोबर असेन
तेव्हा मात्र तू मला सोडून
दूर जाऊ नकोस..
***

करा उत्सव साजरा

काळया आईचा आनंद, तिचा उत्सव हिरवा
येता जाता सांगे मज, लेक माहेरी बोलवा

येणार का सांग पोरी, तुझ्या घरी बाळ राणा
रूप, गुण, नवे नाव, इवल्याशा पायखुणा

का ग वाटतो सारखा, तुज पेपर चाळावा?
येता जाता वाटतो का, जीव झोपवावा?

का ग हिंदोळते मन, स्वप्नी दिसे का पाळणा?
चिडवतो तुला कसा, आज याला बाबा म्हणा

फसली पोरगी, फसविली कोणी?
पांडोबाला आता जाब, विचारावा कोणी?

अगं यालाच म्हणतात, लागला डोहाळा
पुरे झाला पोरपणा, आता जिवाला सांभाळा

कौतुकाचा दिन आज, एकमेका खूष करा
ओवाळून टाका जीव, करा उत्सव साजरा
***

डोहाळे

डोहाळे मज, लागले ग आई
काय हवे ते, देशील ना बाई

एक अंकुरला जीव, माझ्या कुशीत
दोघींच्या मधे, राहू दे गुपित

मला वाटते, यावे कोकणात
पंख लावून, फिरावे धुक्यात

व्हावे ओले पाय, हिरव्या दवात
नाचावे वाटते, लाल मातीत

पोहा-पापड, मऊ तूप-भात
कालवून हवा मला, मोठ्या बशीत

फुलांचा झोपाळा, सजवा पडवीत
पिवळा चाफा, लाल गुलाब, असू देत त्यात

फुलांचा मुगुट, घाला डोईवर
हाती फुलांच्या माळा, गळा फुलांचा हार

केसात मोगरा, पायी फुलांचे घुंगुर
हिरवी पैठणी, लावा चाफ्याचे अत्तर

घाला फुलांची रांगोळी, दारी फुलांचे तोरण
बोलवा साऱ्यांना, सांगा डोहाळे जेवण
***

समजूत

का ग तुझे डोळे ओले? का ग शब्द मूक झाले?
झरझरले नयन तुझे, ते थेंब बोलके झाले

आठवते का गे तुजला, ती रात्र तुझी माझी होती
तुडवीत हिरव्या वाटा, आली होतीस बहरण्यासाठी

मातृ पितृ दैवत होते, राम लक्ष्मण पाठी होते तरीही
झुगारून वैभव सारे, आली होतीस माझ्या मागे

आनंदे होतीस उधळीत, आलीस ओलांडून माप
नाही पाहिलेस मागे, विसरलीस कशी माय-बाप

मी पाहिली होती, ती निरव शांतता माहेराची
अन् पाहिला होता, तो बाग मूक झालेला

समजून घे बाई आता, ही सारी इतिहासाची पुनरावृत्ती
अजून वाट पाहते आहे, ती माहेराची माती

वृद्ध पापणी असेल खिळली, तुझिया स्वागतासाठी
चल जाऊ दोघे आपण, प्रायश्चित्त घेण्यासाठी
***

निरोप

तुझ्या पुढे रे आता मार्ग मोठा
तुला साथ द्याया असे हात छोटा

आशीर्वाद अमुचे तुझ्या पाठीशी
अरे जा मुला तू असा दूर देशी

असे मोह माया दिसे पावलांशी
तिथे स्पष्ट रेषा रामानुजाची

तुझ्याविण आम्ही असू रे उपाशी
विसावा आम्हाला तुझ्या बाहुपाशी
***

शिकवण

असे शब्द तो, नसे अर्थ काही
फुका फुकी तो, तोंडून जाई

असे शब्द भोळा, निघे अर्थ सोळा
अशी वेळ येता, दे सोडून बाळा

असे मनाचा, खेळ सर्व तोही
विचारी मना, तूच शोधून पाही

नसे भाऊ पाठी, नसे बाप डोई
अता सर्व काही, पतीदेव बाई
***

उंचावलेल्या टाचांचा मान

अथांग निळ्याभोर आकाशाला
तू लहान-सहान समजू नकोस
आणि
तुझ्या उंचावलेल्या टाचांना
निराधार ही समजू नकोस
तू जेव्हां प्रयत्न करशील
तेव्हां तुझ्या चवड्याखाली
दगड म्हणून मी स्थित असेन
आणि
उंचावलेल्या टाचांचा मान म्हणून
मी थोडा झुकलोही असेन
परंतु
एक गोष्ट लक्षात ठेव
आकाशात पंख पसरून विहरतांना
उन्मत्त तू होऊ नकोस
आयुष्याच्या संध्याकाळी तू मला विसरू नकोस
तुझा प्रयत्नांती परमेश्वर
***

घुंगूर पाऊल

येणार बाळ तान्हा, येणार बाळ तान्ही
आजी म्हणून हाका, देतील बाळ दोन्ही

ती हाक ऐकण्याला, झाले अधीर कान
त्या बाळ दर्शनाने, होतील धुंद प्राण

कामात गुंतलेले, ते हात खेळणार
ओढून दोन हाता, ती छान हासणार

ते छान हास्य त्यांचे, लावील वेड जीवा
विळखा चतुर्भुजांचा, देई मना विसावा

हाती धरून हाता, ती खेळतील खेळ
गाऊन गोड गाणी, जाईल छान वेळ

त्या सान पाउलांचा, घुंगूर नाद होता
येईल चेव आता, पायास आणि हाता

घुंगूर पाउलांची, आहे खरी पुजारी
आजी म्हणोनी हाका, झाल्या पहा दुहेरी

या स्वर्गिच्या सुखांना, उपमा नसेल काही
या वैभवापुढे गे, फीका पडेल तो ही

बोलात बोबड्या या, होतील तिन्हिसांजा
या बाल वैभवाचे, आम्हीच राणि राजा
***

गांभीर्याचे भान

वहिनी कालचीच गोष्ट आहे नीट ऐका बरं का

घड्याळात वाजले होते सात
नवी साडी नेसून मी केव्हांची उभी दारात
येईन लवकर घरी सांगून गेला होता
नव्हते जमत यायला तर फोन तर करायचा होता
म्हणे एकदा वहिनी रागावल्या होत्या तुम्हाला
सात वाजता तुम्ही किंवा तुमचा फोन हवा यायला
वहिनींच्या शब्दाला, हवा मान द्यायला
असं सुध्दा काही कसं, वाटत नाही तुम्हाला?
येऊ देत वहिनी इकडे, नाही तर हवं मला जायला
तुमचं नाव आता तरी हवं, त्यांना सांगायला
काल काय झालं वहिनी, म्हणजे तसा रोजचाच उशीर
म्हणतात कसे
निघालो होतो लवकर, पण झाला थोडा उशीर
इकडे तिकडे करून लागले आपल्या कामाला
मी त्यांना म्हणाले,
"मी मरायला टेकेन तेव्हा तरी याल ना वेळेवर?
का तेव्हाही म्हणाल, निघालो होतो लवकर
थांबता नाही का आलं तुला, गेलीस कशाला वेळेवर?"
वहिनी ही गोष्ट लक्षात ठेवा बरं का
असं काही म्हणालेच तर, कान धरा त्यांचा

बरं बाई
अग वेळेचे बंधन जमले नाही त्याला कधी
इतक्या सहवासात तुला कळायला हवं आधी
बाईच्या जातीला कळते म्हणे लवकर

तुलाच थोडी समज, द्यायला हवीय आगोदर
एक गोष्ट तुला सांगावीशी वाटते
पटली तर घे नाही तर सोडून दे
गांभीर्याचे भान ठेवून करते थोडे धाडस
पिंट्याचे बाबा तसे, आहेत बघ सालस

एक कानमंत्र देते तुला
नको रागावूस अशी
घरी येतील तेव्हा बोलू नकोस कशी
किट किट करशील तर सारखे बाहेर राहतील
न बोलता साधशील तर
घरी वेळेवर येतील
बोलून सगळ जातंय बघ, न बोलता साधून बघ
नाही काही जमलं तर सांग मला
कान धरून मग शिकवीन मी त्याला
***

आवर तुझा पसारा

कर्तव्य मज देऊन सारे
असमर्थ मज केले का रे ?
कर्तव्याचे ओझे भारी
जर दिलेस माझ्या माथी
मग दे मज सामर्थ्यही
कर वीट तुझी खाली
ना तर
वीट तुझी सोडून ये तू
आवर तुझा पसारा
देऊन शक्ती, युक्ती, बुद्धी
मुक्ती सर्वाला
हरी रे फुकटच्या गर्वाला
शरणागत मी तुझिया चरणी
दे मजसी थारा
बंध मुक्त कर मजला तू
चुकवी येरझारा

कर्तव्य कर्मात बांधून जन्माला घातले आहेस
तर तेव्हढी ताकद पण दे ना.....
***

ट्रोगन पक्षी

ट्रोगन ट्रोगन डोक्यात
मन रमेना कशात
दांडेली दांडेली शोधित वाट
धावली गाडी रस्त्यात

नाच गाणे त्याचे रूप साजिरे
घाली ग पिंगा मनात
खुणावितो बोलावितो
लपतो छपतो रानात

इथे तिथे शोधिती डोळे
पाऊले धावती उन्हात
दावून तोंड फिरवी पाठ
उडून जाई ग रानात

कधी नवे कधी जुने
भेटती मित्र वाटेत
सांगती वेळ आणिक पत्ता
ज्याच्या त्याच्या कानात

काटे नी कुटे, मोठ्ठाले खड्डे
भेटती सदा ग वाटेत
तरीही मन, आणखी पाय
नाचत, धावती उन्हात

घालून जीव, असा धोक्यात
काढिला फोटो, मी जोशात
ट्रोगोन ट्रोगोन चर्चेत
छापून आला ग अंकात

फोन वर फोन, आणिक मित्र
येती नी जाती घरात
कौतुक किती, सारे करती
हर्ष मावेना मनात
***

नवा गडी नवं राज्य

या दुःखानो या असे
माझ्या पाठी लागा
पाठशिवणीचा खेळ खेळू या
आऊट मजला करा
६०,७०,८० रेडी का?
रेडी का? रेडी का?
हो हो म्हणा ऐसे
आनंदाने
जेणेकरून त्याला आपले
अस्तित्व येईल कळून
मग आऊट करेल वरून
नवा गडी नवं राज्य
नवा खेळ मांडू
***

विश्वास

दिलास तू विश्वास मजला
सुरक्षित ठेव माझी तुजजवळी
प्रकाश मजला पुरे एवढा या
कातरवेळी
दिव्यादिव्यांची ज्योत तेऊ दे
तुझ्या नि माझ्या नयनी
दिल्या घेतल्या शब्दांना, ठेव ह्रदयीच्या सिंहासनी

खुशाल तू घेऊन जा, नच उरली मजला भीती
परी विनविते सांभाळ पोरी दोन्ही घरची नाती

सहज तुला सापडेल पोरी, इथेच जागा रमण्याची
डोळे उघडून पाहशील तर, मूठ सव्वा लाखाची

डोईवरची घागर तुझी आहे काठोकाठ भरलेली
जपून टाक पाऊल, सांभाळ घागर कटीवरली
नको घालवू थेंबही वाया, थेंबाथेंबात भरली माया
रुतला काटा कधी तळपाया, ये धावत मज सांगावया
***

हिरवाई

नवी नवेली हिरवाई
पसरू पाहतेय दूरवरी
पायाखाली येणारा हिरवा कोंब
सांभाळत बाजूंनी चालायला हवं
कोंबाशी कोंब वाढत जाईल
हिरवीगार लॉन तयार होईल
आपल्या निवृत्तीच्या वेळी
दारात दिसेल हिरवीगार मऊशार लव्हाळी
तेव्हां हिरवा दिसणारा प्रत्येक कोंबही गारठतो
झाडावरचं फूल देखील
उमलण्या पूर्वी गळून पडतं
ऊन थंडी पाऊस वाऱ्यात मोहर सारा
फळांसाठी सांभाळायला हवा आहे.
***

वितळुनी मिसळले जेव्हां

क्षितिजावर आला तो नटून, सुवर्ण किरणांनी
सवयीने पाहिले त्याने, सहस्र नयनांनी

मी पसरले दोन बाहू, त्यास कवेत घेण्यासाठी
मग स्पर्शलेच त्याने मजला, त्या सुवर्ण हातांनी

मी पाहिले त्याला, सुवर्ण तेज ओततांना
अन् पाहिलेच त्याने मजला, तेजात नाहतांना

मी वितळुनी मिसळले जेव्हां, तो कौतुके पाहत होता
प्रतिबिंब पाहुनी मग तो, अचंबित झाला होता

तो माथ्यावर आला तेव्हां मी नत मस्तक झाले होते
तो देदीप्यमान झाला तेव्हां, मी नयन झाकले होते

तो उतरला स्थान सोडून, अन् कर मस्तकी ठेवले
मग धगधगले असंख्य सूर्य, मी विश्व होऊनी गेले

भारावले मस्तक जेव्हां माथा भानावर आला
घेऊनि सर्व ओझे, तो अस्तास निघोनी गेला

कोहळा घेऊनि जेव्हा, मी पुरती फसले होते
आवळा घेऊनि मजला, नारायण हसले होते
***

तहान

आईसाठी कित्येक मुलं असतात बघ भुकेली
त्यांच्यासाठी ठेव तहान असेल तेवढी उरलेली

अशीच मुलं येतात शेवटी आपल्याही उपयोगाला
आधी असतं यायचं आपण त्यांच्या उपयोगाला

आधीच असते सटवाईने भविष्यवाणी लिहिलेली
आवडत नाही तिला कधी दखल आपण घेतलेली

जसं असतं ज्याचं नशीब तशीच माणसं भेटतात त्याला
देवाचं त्या गणित कधी कळायचे नाही कुणाला

जे होतं ते होतं भल्यासाठी अशी म्हण आहे मराठी
ही म्हण प्रत्येकानं ठेवावी आपल्या आपल्या गाठी

माणसांची पण बेरीज वजाबाकी करावी लागते त्याला
जशी असते ज्याची भूक तसंच मिळतं सुख त्याला

नाही तुज कुणी म्हणूनी नको रडू तूही
जगी ज्यास कोणी नाही तिथे प्रत्यक्ष उभा राही
***

तिन्हीसांजा

पन्नाशीच्या वाटेवर
मला भेटले सरोवर
त्यात पाहिले प्रतिबिंब
झाले होते ओलेचिंब

त्यास पाहुनी गारठले
ओलेती मी घाबरले
पाहताच मी मजला
कायापालट हा कसला?

कसे जाहले हे सारे
डोईवरती केस पांढरे?
पश्चिमेस त्या सूर्य बुडाला
देऊन घन तिमीराला

जाताजाता सांगून गेला
बघ तिन्हीसांजा जाहल्या
***

सोबत

प्रसन्न मी तुजवरती राणी प्रसन्न मी तुजवरती
सांगशील का स्वप्न मनीचे, मज देऊन हात हाती
हवे तुला का वस्त्र जरीचे, अन् अलंकार भारीचे
का मखमली गालिचे, का आकाशी पंख पसरण्याचे
नकोत मजला वस्त्र जरीचे, अन् अलंकार बहुमोलाचे
हवेत मजला रंग प्रितीचे, कृपाछत्र मज हवे पित्याचे
तुज सम मज मिळे घरधनी, कन्यारत्न जणू कंठी तन्मणी
प्रीत तुझी जणू बाजूबंद मनी, स्वर्ग नसे मज दुजा याहुनी
दारी असावे वेल फुलांचे, मागील दारी झाड बकुळीचे
वाऱ्यासंगे ऐकू यावे शब्द कौतुकांचे
मनात येईल त्याच्यापाठी, मजला धावायाचे आहे
सख्या रे सोबत तुझी मज, फक्त अपेक्षित आहे
***

झाली तुझी पन्नाशी

येथे अरुंद होते पाऊलवाट
प्रत्येक पाऊल जपून टाक
येथे असतात काटेकुटे
थोडे दगड आणि धोंडे
थोडी असते निसरडी वाट
मागे पुढे कोणी असतं नसतं
कुत्रंही येतं आडवाटेवर
तेच करतं आपली राखण

अगं पुरुषच असतात खरे भित्रे
आपणच सावलीसारखे पाठी रहायचे
वाटाड्याचा मान देऊन
त्यांना पुढे चालवायचे
धीर देत निर्भय बनवायचे

इथे अंधारही भेटतो कधी कधी
तेव्हा राम राम म्हणायचे
तोच दाखवतो पैलतीर
आमच्या मागून या दोघं
म्हणजे काळजी नाही एकटेपणाची
मी पडले तेव्हा सावरलंस मला
त्याच दगडावर तू पडलीस कशाला?
अवघड घाट, अंधारी वाट
दिसत नाही म्हणून ठरत नाही खोटी
इथे आपोआपच सुटतात
हातातले हात
खांद्यावरला हात, पाठीवरली थाप
मागून येणारी हाक, पुढून येणाऱ्या सूचना

कान टवकारून ऐकायच्या असतात
तुझ्या हातात आहे भविष्याचा कंदील
तुलाच वाटाड्या व्हायचं आहे
माझ्या सारखे तूही घाल अबोलीचे गजरे
सगळे केस पिकले तरी
पहिल्या रात्री घातलेले अजूनही अबोलच आहेत
***

कधी कधी

कधी कधी कविताच माझी
सावली सारखी पाठी येते

कधी कधी सावलीच माझी
कवितेच्या गावा घेऊन जाते

कधी कधी सावलीच डावी
हात धरोनी रस्ता दावी

शब्द मोजके देऊन हाती
कविता माझी होते उजवी

कधी कधी कविता उजवी
माथ्यावरती येऊन बसते

प्रकाश तिचा माथ्यावरचा
पायतळी वास सावलीचा

कधी कधी मी कविता
पायतळी सावली फुलोरा
***



प्रतिभा गोरे यांची

ई साहित्यवरील पुस्तके

कव्हरवर एकच क्लिक केले

की पुस्तक उघडेल



चंद्र, फुले, मृग, तारे येती
जसे धरित्रीवर
तशी कविता रिझवित येते
ई साहित्यावर

खूप साऱ्या कविता वाचण्यासाठी
आपल्या सुंदर कवितांचा आनंद इतरांना
देण्यासाठी

ई-मैफल

www.esahity.com
esahity@gmail.com
9987737237(Whatsapp)



कोणती चाहूल नाही
स्पर्शही ना लाभतो
पण मनाला वाटते तो
नित्य सोबत चालतो

तो दयाळू सर्वसाक्षी
तीर्थक्षेत्री त्रिभुवनी
चालते आहे कधीची
चालवीता तो धनी

वाहतो आहे अनादी
अमृताचा तो झरा
खोल तृष्णा त्रिभुवनाची
शांत करण्या ती धरा

व्यापकाला सानुल्याशा
बांधुनी नावामधे
आळवीता मी तयाला
नांदला माझ्यामधे
*
प्रतिभा गोरे